।। अंतरी पेटवू ज्ञानज्योत ।।

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**

**(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव)**

1990 'A' Grade NAAC Re-Accredited (3rd Cycle)

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## * अधिसूचना क्र.३/२०२२ *

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ चे कलम २८(२)(द) नुसार, अधिसभेवर व कलम ३२ (३) (छ) नूसार विद्यापरिषदेवर "अध्यापक गटाने" त्यांच्यामधून निवडून द्यावयाचे सदस्यांकरीता "निर्वाचक गण" (Collegium of Teachers / Electoral College) तयार करण्यासाठी माहिती पाठविणे बाबत ......**

विद्याविषयक स्वायत्तता व अत्युच्च गुणवत्ता, लोकशाही प्रक्रीयेव्दारे पर्याप्त प्रतिनिधीत्व, त्याचे बळकटीकरण व विनियमन यांकरीता आणि त्यांच्याशी संबंधित किंवा तदनुषंगिक बाबींकरीता, महाराष्ट्र विद्यापीठे अधिनियम, १९९४ निरसीत करुन महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ दि.१ मार्च, २०१७ पासून अंमलात आणण्यात आलेला आहे.

१. सदरच्या महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ चे कलम (२) मध्ये खालील प्रमाणे तरतूद आहे.

* पोट कलम १८, "अध्यापकांचा गट" याचा अर्थ, जे संलग्न व स्वायत्त महाविद्यालयांचे आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांचे अध्यापक आपल्यामधून निरनिराळया प्राधिकरणांचे सदस्य म्हणून निवडून येतील अशा, संलग्न व स्वायत्त महाविद्यालयांच्या आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांच्या अध्यापकांनी मिळून बनवलेला निर्वाचक गण, असा आहे.

* पोट कलम ६१, "अध्यापक" याचा अर्थ, विद्यापीठाच्या कोणत्याही विभागातील संचालित, संलग्न किंवा स्वायत्त महाविद्यालयातील, स्वायत्त परिसंस्थेतील किंवा विभागातील किंवा विद्यापीठातील मान्यताप्राप्त परिसंस्थेतील पूर्णकालिक मान्यताप्राप्त प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, सहायक प्राध्यापक, प्रपाठक, अधिव्याख्याता, ग्रंथपाल, प्राचार्य, परिसंस्थेचा संचालक, ज्ञान स्रोत केंद्राचा संचालक, आजीवन अध्ययन व विस्तार केंद्राचा संचालक, विद्यापीठाचा उप किंवा सहायक ग्रंथपाल व महाविद्यालयाचा ग्रंथपाल, शारीरिक शिक्षण संचालक किंवा निर्देशक, असा आहे ;

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ 1990 'A' Grade NAAC Re-Accredited (3rd Cycle) जळगाव-४२५००१

..२

उमविनगर, जळगाव - ४२५००१ (महाराष्ट्र) भारत , दुरध्वनी क्र.: ०२५७-२२५८४२८, २२५८४२९ फॅक्स क्र.: ०२५७-२२५८४०३,४०६

Umavinagar, Jalgaon - 425 001 (Maharashtra) INDIA, Telephone No. 0257- 2258428, 2258429

Fax No. 0257-2258403, 406. E-mail : registrar@nmu.ac.in Web: www.nmu.ac.in

**अधिसभा -**

* कलम २८(२) (द), प्राचार्य आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांचे संचालक यांच्या खेरीज अध्यापक गटाने त्यांच्यामधून निवडून द्यावयाचे दहा अध्यापक, ज्यापैकी प्रत्येकी एक अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती) किंवा भटक्या जमाती, इतर मागासवर्ग या प्रवर्गातील व्यक्ती असेल आणि एक महिला असेल.

**विद्यापरिषद -**

* कलम ३२ (३)(छ), अध्यापक गटाने आपल्यामधून निवडून द्यावयाचे पंधरा वर्षापेक्षा कमी नसेल इतका अध्यापनाचा अनुभव असलेले, प्रत्येक विद्याशाखेचे प्रतिनिधित्व करणारे दोन अध्यापक, त्यापैकी एक अनुसूचित जातीची किंवा अनुसूचित जमातीची किंवा निरधिसूचित जमातीची (विमुक्त जाती) किंवा भटक्या जमातीची किंवा इतर मागासवर्गाची व्यक्ती असेल परंतु प्रत्येक विद्याशाखेचे आरक्षण हे चिठ्ठया टाकून काढलेल्या सोडतीव्दारे ठरविण्यात येईल:

परंतु, या खंडान्वये, प्रत्येक विद्याशाखेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या अध्यापकांपैकी, एक अध्यापक ही, चिठ्ठया टाकून काढलेल्या सोडतीव्दारे ठरविण्यात येईल अशी महिला असेल.

२. ज्याअर्थी, वरील कायद्याचे कलम २७ व्दारे, प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन, विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाचा सदस्य म्हणून निवडून येण्याच्या, नामनिर्देशित करण्याच्या अथवा स्वीकृत करुन घेण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने दि.२८ एप्रिल, २०१७ रोजी अधिसूचना निर्गमित करुन, त्याव्दारे ज्ञ

**अधिसभेवर -**

सदरच्या कायद्याचे कलम २८(२)(द) नूसार, अधिसभेवर अध्यापक (प्राचार्य आणि मान्यताप्राप्त संस्थांचे संचालक यांचे खेरीज इतर)" अध्यापकांच्या गटाने त्यांच्यामधून प्राधिकरणाचा. सदस्य म्हणुन निवडून येण्यासाठी पात्रता शर्ती खालील प्रमाणे विनिर्दिष्ट केलेल्या आहेत.

क. पीएच.डी. पदवी धारक असावा आणि एकूण किमान दहा वर्ष अध्यापनाचा अनुभव असावा,

किंवा

एकूण किमान पंधरा वर्ष अध्यापनाचा अनुभव असावा

ख. विद्यापीठाच्या परिक्षांशी संबंधीत कामकाज एकूण किमान पाच वर्ष केलेले असावे.

..३

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव-४२५००१

**विद्यापरिषदेवर -**

सदरच्या कायद्याचे कलम ३२ (३)(छ) नूसार, विद्यापरिषदेवर, अध्यापक गटाने (प्रत्येक विद्याशाखेचे प्रतिनिधित्व करणारे दोन अध्यापक) त्यांच्या मधुन प्राधिकरणाचा सदस्य म्हणून निवडून येण्यासाठी पात्रता शर्ती खालील प्रमाणे विनिर्दिष्ट केलेल्या आहेत.

क. पीएच.डी. पदवी धारक असावा,

ख. एकूण किमान पंधरा वर्ष अध्यापनाचा अनुभव असावा,

ग. मान्यताप्राप्त पीएच.डी. मार्गदर्शक असेल ज्याच्या पर्यावेक्षणाखाली किमान दोन विद्यार्थ्यांना पीएच.डी.पदवी प्रदान करण्यात आली असेल,

घ. किमान दोन पाठयपुस्तकांचा/संदर्भ पुस्तकांचा लेखक/सहलेखक असावा किंवा मुळ लेखक/अनुरुप लेखक म्हणुन तज्ञ परिक्षीत जर्नल्स् मध्ये किमान तीन शोध निबंध प्रसिध्द केलेले असावे.

ङ विद्यापीठाच्या परिक्षांशी संबंधित कामकाज एकूण किमान पाच वर्ष केलेले असावे.

३. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६, चे कलम ६२(१) नुसार, विद्यापीठाच्या विद्यमान प्राधिकरणांच्या सदस्यांची मुदत दि.३१ ऑगस्ट, २०२२ रोजी संपूष्टात येत आहे. सदर कायद्याच्या कलम ६२ (२) नूसार, अधिसभेवर दि.१ सप्टेंबर, २०२२ ते दि.३१ ऑगस्ट, २०२७ या कालावधीसाठी नवनिर्वाचित सदस्यांची निवडणुक, नामनिर्देशन व स्वीकृतीची प्रक्रीया सुरु करण्यात आली असून वरील कायद्याच्या कलम २(१८) विचारात घेवून, कलम २८(२)(द) नूसार, अधिसभेवर आणि कलम ३२(३)(छ) नुसार, विद्यापरिषदेवर अध्यापक गटामधून निवडून देण्यासाठी निर्वाचक गण (Collegium of Teachers/ Electoral College) तयार करावयाचा आहे.

४. तरी, सर्व संलग्नित, संचलित व स्वायत्त महाविद्यालयाचे प्राचार्य व मान्यताप्राप्त परिसंस्थांचे संचालक यांना, मला मा.कुलगुरु महोदयांकडुन प्राप्त झालेल्या आदेशान्वये विनंती करण्यात येते की,

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ व राज्य शासनाने प्राधिकरण सदस्य म्हणुन निवडून येण्यासाठीच्या पात्रता, शर्ती, संदर्भात दि.२८ एप्रिल, २०१७ रोजी निर्गमित केलेली अधिसूचना व त्याअनुषंगाने भरुन द्यावयाचा विहित नमुना (Form C) या अधिसूचने सोबत विद्यापीठाच्या www.nmu.ac.in. या संकेतस्थळावरील universityauthoritieselection-2022 या पोर्टल वर प्रसिध्द करण्यात आलेला आहे. कृपया त्याचे अवलोकन करुन, सर्व पात्रता धारकांनी खालील वर्णन केलेल्या दस्तऐवजांच्या प्रती सह स्वसाक्षांकीत करुन ऑनलाईन पध्दतीने सादर करावी.

१. संबंधित अध्यापकाच्या शिक्षक मान्यतेस विद्यापीठाने निर्गमित केलेल्या "शिक्षक मान्यता" पत्राची प्रत.

२. संबंधित अध्यापकाच्या पीएच.डी. पदवी प्रमाणपत्राची आणि त्यांस एकूण किमान दहा वर्ष अध्यापनाचा सक्षम अधिकाऱ्याने निर्गमित केलेले अनुभव प्रमाणपत्राची प्रत.

३. संबंधित अध्यापक मागासप्रवर्गाचा असल्यास सक्षम अधिकाऱ्याने निर्गमित केलेल्या त्याचा जातीचा दाखला व जात प्रमाणपत्र पडताळणी अहवालाची प्रत.

४. विद्यापीठाच्या परिक्षांशी संबंधित कामकाज एकूण किमान पाच वर्ष केलेले असल्याबाबत विद्यापीठाने निर्गमित केलेले अनुभव प्रमाणपत्राची प्रत.

५. संबंधित अध्यापक हा पदव्युत्तर केंद्रामधील मान्यताप्राप्त पदव्युत्तर अध्यापक असल्यास पदव्युत्तर अध्यापक म्हणून विद्यापीठाच्या मान्यता पत्राची प्रत.

वरील प्रमाणेची संपूर्ण माहिती विहित नमून्यात, विद्यापीठाच्या वरील संकेतस्थळावर **दि.३१/०८/२०२२ वार बुधवार** रोजी सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत अपलोड करुन त्याची हार्ड कॉपीवर नजीकच्या काळात काढलेला पासपोर्ट साईज कलर फोटो व स्वत:ची स्वाक्षरी करुन अनुषंगिक सर्व दस्तऐवजांसह संबंधित महाविद्यालयात/परिसंस्थेमध्ये **दि.०२/०९/२०२२ वार शुक्रवार** पर्यंत जमा करावे व संबंधित महाविद्यालयाने सदरची स्विकारलेली माहिती ही पोस्टाव्दारे/खास दुता मार्फत विद्यापीठाच्या निवडणुक शाखेकडे **दि.०५/०९/२०२२ वार सोमवार** रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत पाठवून सहकार्य करावे. केवळ ऑनलाईन पध्दतीने माहिती पाठवून त्याची स्थळ प्रत विद्यापीठ कार्यालयात जमा न केल्यास ऑनलाईन पध्दतीने प्राप्त झालेली माहिती विचारात घेतला जाणार नाही.

वरील संदर्भात सर्व संलग्नित, संचलित व स्वायत्त महाविद्यालयाचे प्राचार्य व मान्यताप्राप्त परिसंस्थांचे संचालक यांचेकडून जी माहिती प्राप्त होईल त्यावर विसंबून राहुन वरील कलमां अंतर्गत घ्यावयाच्या निवडणुकीचा "निर्वाचक गण" (Collegium of Teachers / Electoral College) तयार करुन निवडणुक प्रक्रीया अवलंबली जाईल.

सदरची माहिती ही वरील विहित कालावधीत सादर करण्याची जबाबदारी ही संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य आणि संस्था अध्यक्ष यांचीच राहील. विहित कालावधी नंतर प्राप्त होणारी माहिती विचारात घेतली जाणार नाही व त्याच्या होणाऱ्या परिणामांस विद्यापीठ प्रशासन जबाबदार राहणार नाही.

१४/७/२२

जा.क्र.कबचौउमवि/२/ ०९ /सिनेट-वि.प/२०२२
दि: १४ / ७ /२०२२

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव-४२५००१

**(डॉ.शा.रा.भादलीकर)**
**निवडणुक विभागप्रमुख**
**तथा उपकुलसचिव**
**विधी/माहितीचा अधिकार**
**कबचौउमवि, जळगाव**

*टीप:* या संदर्भात e-mail id ***election2022@nmu.ac.in*** वर पत्रव्यवहार करणेस विनंती आहे.

प्रत माहितीसाठी: (ई-मेलव्दारे)

१) मा.प्राचार्य/संचालक, सर्व संलग्न व स्वायत्त महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त परिसंस्था
सदरची अधिसूचना ही आपल्या महाविद्यालयाच्या/परिसंस्थेच्या नोटीसबोर्डावर प्रसिध्द करुन सर्व संबंधितांचे निदर्शनास आणून द्यावी.

२) जनसंपर्क अधिकरी, कबचौ उमवि, जळगाव

।। अंतरी पेटवू ज्ञानज्योत ।।

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव)

1990 'A' Grade NAAC Re-Accredited (3rd Cycle)

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## FORM - C

| Information of Teacher (other than Principal/Director) of Affiliated Colleges/Recognized Institution for Election-2022 | Application ID (for office use) | Please paste your recent colour photograph (self-attested) / Signature |
|---|---|---|

To,
The Registrar, Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon-425001.

**PERSONAL DETAILS :**

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| Full Name (capital) | SURNAME | | FIRST NAME | | MIDDLE NAME | |
| Correspondence Address | | | | | | |
| Name of College/ Institute and present position occupied | | | | | | |
| Date of Birth | DD/MM/YY | Gender | MALE/FEMALE/ TRANSGENDER | Category SC/ST/VJ or NT/OBC/OPEN | | |
| Mobile No. | | Email ID: | | | | |
| * Aadhar Card No. | | | | | | |

**SERVICE DETAILS:**

| | | |
|---|---|---|
| Assistant Professor as per Statute 415 (1) | Date of Joining<br>Total Experience | Approval Letter No. |
| Associate Professor | Date of Joining<br>Total Experience | Approval Letter No. |
| Professor | Date of Joining<br>Total Experience | Approval Letter No. |
| Name of the College / Institute | | |

**SUBJECT DETAILS:**

**Faculty**

| | | | |
|---|---|---|---|
| Subject | | Subject Specialization : | |

**Teaching Experience Details :**

Under Graduate Level Experience

| | | | |
|---|---|---|---|
| From Date: | | To Date : | |

Post Graduate Level Experience

| | | | |
|---|---|---|---|
| From Date : | | To Date : | |



उमविनगर, जळगाव - ४२५००१ (महाराष्ट्र) भारत , दुरध्वनी क्र.: ०२५७-२२५८४२८, २२५८४२९ फॅक्स क्र.: ०२५७-२२५८४०३,४०६

Umavinagar, Jalgaon - 425 001 (Maharashtra) INDIA, Telephone No. 0257- 2258428, 2258429

Fax No. 0257-2258403, 406. E-mail : registrar@nmu.ac.in Web: www.nmu.ac.in

| | | |
|---|---|---|
| **Publication Details.:** | | |
| Number of Publications | National<br>International | |
| | Total | |
| ISBN / ISSN No. of National Publications | | |
| ISBN / ISSN No. of Inter-National Publications | | |
| h-index (Google Scholar/Web of Science) : | | |

| | | | |
|---|---|---|---|
| **Post Graduate Teacher Details: (if applicabale)** | | | |
| **Whether Appointed as P.G.Teacher ? :** | **Yes/No** | **Date of Joining**<br><br>**Total Experience** | **Appointment Letter No & Date.** |
| **Whether Approved as P.G.Teacher ?** | **Yes/No** | | **Approval Letter No & Date** |
| **Whether Recognized as P.G.Teacher ? :** | **Yes/No** | | **Recognition Letter No. & Date** |
| **Name of PG Department/College/Institute where presently working** | | | |
| | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| **Ph.D.Details:** | | | |
| Are you Ph.D.holder ? : | | Degree Certificate/ Notification (Ph.D.) | |
| Whether Ph.D.Guide ?: | | Guide Recognition Letter No. : | |
| | | No.of Students awarded Ph.D. : | |
| No. of Student doing Ph.D.: | | | |
| Publication Details.: | | | |

Whether any criminal case or disciplinary inquiry is pending against you or you have ever been convicted for any offence? If so, give details thereof.

Place :
Date:

**Signature of Teacher**

**Declaration**

This to certify that, the above mentioned information is true and verified by me.

Place :
Date:

**PRINCIPAL/DIRECTOR**
**Signature and Seal**

**CHAIRMAN/SECRETARY**
**College/Institute**

| | |
|---|---|
| Note:- | |
| 1. | The above mention information be furnished only by the University approved Teacher appointed and approved under Statute 415 (1). |
| 2. | Attachment- Attested Photocopies of proofs. |

Enclosures:

1. Degree Certificate of Ph.D.
2. Experience Certificate.
3. Copy of appointment order as well as approval letter.
4. Copy of caste certificate and caste validity certificate (if reservation claimed)
5. Copy of Experience certificate relating to Examination work issued by competent authority of the University.